गुरुवार, २२ जानेवारी २०१५

सकाळ सातारा TODAY

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय

# 'डीपी'त अत्याधुनिक शैक्षणिक सुविधा

## डॉ. पतंगराव कदम; कोरेगावमध्ये स्थानिक व्यवस्थापन समितीची बैठक

**पळशी, ता. २१ :** डी. पी. भोसले महाविद्यालयाच्या माध्यमातून कोरेगाव व परिसरातील बहुजन समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी नजीकच्या काळात पदवी तसेच पदव्युत्तर स्तरावरील अत्याधुनिक शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून अन्य अभ्यासक्रम सुरू केले जातील आणि या महाविद्यालयाचा चेहरामोहरा बदलला जाईल, असे आश्वासन रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य व स्थानिक व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष आमदार डॉ. पतंगराव कदम यांनी दिले.

स्थानिक व्यवस्थापन समितीच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी 'रयत'चे उपाध्यक्ष डॉ. अनिल पाटील, सचिव प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर उपस्थित होते. याप्रसंगी डॉ. कदम यांनी विविध निर्णय घेतले.



**कोरेगाव : डी. पी. भोसले महाविद्यालयातील बैठकीत बोलताना डॉ. पतंगराव कदम. या वेळी डॉ. अनिल पाटील, डॉ. गणेश ठाकूर, डॉ. विजय सावंत.** (छायाचित्र : **अधिक बर्गे, कोरेगाव**)

त्यानुसार, विज्ञान विभागामध्ये पदवी स्तरावर वनस्पतिशास्त्र, भौतिकशास्त्र, प्राणिशास्त्र तसेच पदव्युत्तर स्तरावर मराठी, हिंदी, अर्थशास्त्र, भूगोल, वाणिज्य विषय सुरू करण्याचा निर्णय झाला. त्याचबरोबर तीन वर्षांत सहा कोर्स पूर्ण करता येतील, असे २० ते ५० शॉर्ट टर्म कोर्स, भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, गुरुकुल प्रकल्प, आय. टी., संगणकशास्त्र अशा सुविधांसह सर्व भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्याचा निर्णय झाला. यावेळी अॅड. विजयराव कणसे, शहाजीराव बर्गे, माजी प्राचार्य अरुण बर्गे, उपसरपंच प्रतिभाताई बर्गे, शिवाजीराव महाडीक, डॉ. गणेश होळ, राजेश बर्गे, पृथ्वीराज बर्गे आदींनी गुणवत्तावाढीच्या दृष्टीने अन्य उपक्रम राबवावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली. या महाविद्यालयास आवश्यक ते सर्व सहकार्य केले जाईल, असे डॉ. अनिल पाटील यांनी सांगितले. विद्यार्थ्यांना केंद्रस्थानी ठेवून सेवकांनी कर्तव्याशी प्रामाणिक राहावे, असे डॉ. ठाकूर यांनी सांगितले. अकरावी, बारावीसाठी क्रॅश कोर्स सुरू करणार असल्याची माहिती प्राचार्य डॉ. विजय सावंत यांनी प्रास्ताविकात दिली. बैठकीस ज्ञानदेव भोसले, माजी प्राचार्य एस. के. पाटील, श्रीरंग भोसले, प्रा. दिलीप पवार, प्रा. चंद्रकांत जावळे, प्रा. राबन मुल्ला, मारुतराव पवार उपस्थित होते.